# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.01.2026** **वारःरविवार**

---

•पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारताच्या विकासकामांना वेग देणाऱ्या सव्वा ३ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्‌घाटन

•दुसरी जागतिक बौद्ध शिखर परिषद नवी दिल्ली इथं या महिन्याच्या २४ तारखेला

•आठ युरोपीय देशांतील वस्तूंवर १० टक्के आयात शुल्क लावण्याची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

आणि

•भारत न्यूझीलंड दरम्यान ५० षटकांचा तिसरा आणि अंतिम सामना आज इंदूर इथं खेळला जाणार

**<u>वंदेभारत-मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारताच्या विकासकामांना वेग देणाऱ्या ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं काल उदघाटन केलं.

मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, आणि गुवाहाटीमधील कामाख्या दरम्यान धावणाऱ्या, देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला पंतप्रधानांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवला.

शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून यामुळं लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार आहे. एकंदर ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. प्रवाशांना परवडणाऱ्या दरात ही सेवा देण्यात येणार आहे.
वर्ष २०४७ पर्यंत देश विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेनं वाटचाल करत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी काल केलं. बंगालमधील मालदा इथं एका जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

**<u>पंतप्रधान-आसाम</u>**

बोडो शांतता करारामुळं समाजाला खूप फायदा झाला असून हजारो तरुण शस्त्रं आणि हिंसाचार सोडून मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आसाममध्ये काल गुवाहाटी इथल्या अर्जुन भोगेश्वर बारुआ क्रीडा संकुलात पारंपारिक बोडो सांस्कृतिक कार्यक्रम बागुरुंबा दोहू २०२६ ला उपस्थित राहून, सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

शांतता करार झाल्यापासून केंद्र सरकारच्या १५ शे कोटी रुपयांच्या मदतीमुळं बोडोलँड प्रदेशाच्या झालेल्या अभूतपूर्व विकासावर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला.

**<u>बौद्ध-शिखर-परिषद</u>**

केंद्रीय संस्कृती मंत्रालय आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघ संयुक्तपणे नवी दिल्ली इथं या महिन्याच्या २४ तारखेला दुसरी जागतिक बौद्ध शिखर परिषद आयोजित करणार आहेत. ही शिखर परिषद सामूहिक ज्ञान, संयुक्त आवाज आणि परस्पर सहअस्तित्व या संकल्पनेवर आयोजित केली जाईल, अशी माहिती मंत्रालयानं दिली. सामाजिक सौहार्द जोपासण्यासाठी आणि रचनात्मक आंतरराष्ट्रीय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी बौद्ध तत्वज्ञानाची प्रासंगिकता अधिक दृढ करण्याविषयी ही संकल्पना आहे. दोन दिवसांच्या या कार्यक्रमात सुमारे २०० प्रतिनिधी सहभागी होत असून यात सर्वोच्च कुलगुरू, राष्ट्रीय बौद्ध संघांचे प्रमुख, प्रख्यात भिक्षू, विद्वान आणि जगभरातील ज्येष्ठ मान्यवरांचा समावेश असल्याचं मंत्रालयानं पुढं म्हंटलं आहे. जलद तांत्रिक प्रगतीच्या युगात बुद्ध धम्माची मूलभूत मूल्यं, नैतिक नेतृत्व, सामाजिक सौहार्द आणि शाश्वत जीवन कसं प्रेरित करू शकतात यावर चर्चा देखील या शिखर परिषदेत होईल.

**<u>ब्रँड-इंडिया</u>**

संरक्षण उत्पादन सचिव संजीव कुमार उद्या केनियाला होणाऱ्या तिसऱ्या भारत-केनिया संरक्षण प्रदर्शन आणि चर्चासत्रासाठी चार सदस्यीय भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. संरक्षण उत्पादन विभागाच्या ब्रँड इंडिया योजनेअंतर्गत हा तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला जाईल. या कार्यक्रमामध्ये २० भारतीय संरक्षण कंपन्या विविध संरक्षण उत्पादनं आणि सेवांचं प्रदर्शन करतील, अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. या भेटीदरम्यान संजीव कुमार केनियाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका देखील घेतील. भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षमतांना प्रोत्साहन देणं आणि परस्पर सहकार्याच्या संधींचा शोध घेणं हे द्विपक्षीय बैठकांचं उद्दिष्ट असेल.

**<u>जॉर्ज कुरियन</u>**

अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी केंद्रीय योजनांमध्ये काही बदल करण्यात आले आल्याचं केंद्रीय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन म्हणाले. ते काल केरळमध्ये कोट्टायम इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. केंद्रीय योजना प्रभावीपणे राबवून आर्थिक संकटावर मात करण्यासाठी केरळ सरकार पुरेसे प्रयत्न करत नसल्याचा त्यांनी आरोप केला. केंद्रीय निधी नाकारण्याचं आणि केवळ कर्ज घेण्यावर अवलंबून राहण्याचं धोरण केरळ सरकार अवलंबत असल्याचं ते म्हणाले.

**<u>अमेरिका-आयात-शुल्क</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आठ युरोपीय देशांचा ग्रीनलँडवरील नियंत्रणाला विरोध असल्याचं कारण देत त्या देशांतील वस्तूंवर १० टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली आहे. डेन्मार्क, नॉर्वे,

स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड किंग्डम, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांना हे शुल्क फेब्रुवारीपासून लागू होईल असं समाज मध्यमावरील पोस्ट मध्ये ट्रम्प यांनी म्हंटलं आहे.

अमेरिकेकडून ग्रीनलँडची संपूर्ण खरेदी म्हणून वर्णन केलेल्या करारावर सहमती झाली नाही तर १ जूनपासून हा कर २५ टक्क्यांपर्यंत वाढवला जाईल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<u>विंग्जइंडिया</u>**

आशियातील सर्वांत मोठ्या नागरी विमान वाहतूक कार्यक्रम विंग्ज इंडिया २०२६चे उद्‌घाटन केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांच्या हस्ते येत्या २८ तारखेला होणार आहे. भारतीय विमान वाहतूक: आरेखन ते विमान तैनात करणे, उत्पादन ते देखभाल, सर्वसमावेशकता ते नाविन्यता आणि सुरक्षा ते शाश्वतता याद्वारे भविष्यातील मार्ग प्रशस्त करणे हे या चार दिवसांच्या जागतिक कार्यक्रमाचे विषयसूत्र आहे. भारताचे वेगाने विस्तारणारे विमान वाहतूक क्षेत्र, वाढत्या जागतिक प्रभावावर आणि उत्पादन सेवा, नावीन्य आणि शाश्वत विमान वाहतूक उपायांसाठीचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येणाऱ्या भारताचा दृष्टीकोन अधोरेखित करणार आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय प्रदर्शन, विमानांचे स्थिर प्रदर्शन, उड्डाण आणि हवाई कसरली तसेच उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय परिषद, उड्डाण क्षेत्रातील रोजगार मेळा आदींचे आयोजन केले जाणार आहे.

**<u>दोस्ती-त्रिपक्षीय-सराव</u>**

भारतीय तटरक्षक दल, श्रीलंका तटरक्षक दल तसंच मालदीव राष्ट्रीय संरक्षण दल यांच्यात १७ वा दोस्ती त्रिपक्षीय सराव आज मालदीवमधील माले इथं सुरू झाला. दोस्ती सरावाचा बंदर टप्पा सध्या सुरू असून यामध्ये सहयोगी MARPOL सराव आणि संयुक्त VBSS कवायतींचा समावेश आहे. परस्पर कार्यक्षमता आणि सौहार्द वाढविण्यासाठी प्रदूषण प्रतिसाद उपकरणं, टेबलटॉप सराव आणि क्रॉस-बोर्डिंग SOP चं थेट प्रात्यक्षिक घेण्यात आले. शिवाय, भारतीय तटरक्षक दलाची जहाजं आणि विमानं पुढील सागरी टप्प्यात सहभागी होणार आहेत. यापूर्वी, भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक परमेश शिवमणी यांना भारताच्या 'SAGAR' व्हिजन आणि शेजार-प्रथम धोरण राबवून द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी मालदीव राष्ट्रीय संरक्षण दलाच्या प्रमुखांनी निमंत्रित केलं होतं.

**<u>पीफ-वाळिंबे</u>**

मराठी चित्रपट पुढे जावेत आणि प्रेक्षकांनी अधिकाधिक पाठिंबा द्यावा, यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी काम करीत असून, नागपूर आणि नाशिक इथं चित्रनगरी उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर यांनी काल पुण्यात सांगितलं. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये ‘चित्रपट परिसंस्था’, या विषयावर आयोजित चर्चेमध्ये साजनीकर बोलत होते. महाराष्ट्र शासनाचं चित्रपट धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले.

आसामी आणि इस्रायली आंतरराष्ट्रीय सहनिर्मिती असलेला ‘मर्डर्स टू क्लोज – लव्ह टू फार’ हा चित्रपट काल पिफमध्ये ‘ग्लोबल सिनेमा’ विभागात कलाकारांच्या उपस्थितीत दाखविण्यात आला. आसामच्या दिग्दर्शिका मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वोलमन यांनी त्याचं दिग्दर्शन केलं आहे. सत्ता आणि स्त्रिया यांच्या संघर्षाची कहाणी या चित्रपटात मांडण्यात आली आहे.

**<u>छत्तीसगड-माओवाद-पूल-चिंचोळकर</u>**

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांची संख्या चार झाली आहे. मृतांमध्ये एका महिला माओवादीचा समावेश आहे. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणाहून एके-४७ सह दोन रायफल देखील जप्त केल्या आहेत. जिल्ह्याच्या वायव्य भागातील जंगली आणि डोंगराळ भागात जिल्हा राखीव रक्षक, कोब्रा बटालियन आणि विशेष कार्य दलाच्या संयुक्त पथकानं शोध मोहीम सुरू केल्याचं बिजापूरचे पोलिस अधीक्षक डॉक्टर जितेंद्र यादव यांनी सांगितलं.

**<u>क्रिकेट-U19</u>**

पुरुषांच्या एकोणीस वर्षाखालील ५० षटकांच्या आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, झिम्बाब्वे मधील बुलावायो इथल्या क्वीन स्पोर्ट्स क्लब मैदानावर झालेल्या सामन्यात, भारतानं काल बांगलादेशचा १८ धावांनी पराभव केला.

**<u>भारत-न्यूझीलंड-क्रिकेट</u>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पुरुषांच्या ५० षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतील निर्णायक तिसरा आणि शेवटचा सामना आज इंदूरमधील होळकर स्टेडियमवर होत आहे. सामना दुपारी दीड वाजता सुरू होणार आहे. पहिला सामना भारतानं जिंकला तर न्यूझीलंडनं दुसरा सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. पन्नास षटकांच्या सामन्यांच्या १९८९ मधील उभय देशांतील भारतातील पहिल्या मालिकेपासून आजतागायत, न्यूझीलंडला यजमानांविरुद्ध अद्याप मालिका विजय नोंदवता आलेला नाही.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं पुढील दोन दिवस दिल्ली, हरियाणा, चंदीगड, पंजाब आणि बिहारमधील काही ठिकाणी दाट धुक्याची शक्यता वर्तवली आहे. जम्मू आणि काश्मीर, लडाख, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्येही आज अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे, तर मध्य प्रदेशचा काही भाग, छत्तीसगड आणि ओडिशामध्ये थंडीची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. पुढील दोन दिवसांत वायव्य आणि मध्य भारतात किमान तापमानात सुमारे 2 अंश सेल्सिअसनं वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार